PARLE MAHOTSAV

Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

# कृपया प्रसिद्धीकरिता

## हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांना भारतरत्न प्रदान करण्यात यावे- गोपीनीथ मुंडे

## पहिल्याच दिवशी १४ व्या पार्ले महोत्सवात पाच हजार स्पर्धकांनी घेतला सहभाग

**दि. २२.१२.२०१३**

मुंबईः हॉकीचे जादुगार म्हणुन जगविख्यात मेजर ध्यानचंद यांनाही भारतरत्न प्रदान करण्यात यावे अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे लोकसभेतील उपनेते श्री.गोपीनाथ मुंडे यांनी केली आहे. सचिन तेंडुलकर यांना भारतरत्न मिळाल्यामुळे क्रिडापट्टुंना सर्वोच्च मान मिळाला आहेच पण अजुनही मेजर ध्यानचंद यांचे नाव भारतरत्न पुरस्कारापासुन वंचित राहिले आहे, असे १४ व्या पार्ले महोत्सवाच्या उभारलेल्या भारतरत्न सचिन तेंडुलकर गौरांगण येथे उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी मेजर ध्नानचंद यांचे पुत्र भारतीय हॉकी संघाचे माजी कर्णधार श्री. अशोक कुमार व संपुर्ण परिवार उपस्थीत होते. पार्ले महोत्सव हे हजारो लोकांना आपल्यामधील कलागुण विकसीत करण्यासाठी एक सुयोग्य व्यासपीठ असून या आयोजनाबाबत अॅड. पराग अळवणी व त्यांच्या टीमचे अभिनंदन केल. उद्घाटन प्रसंगी करण्यात आलेल्या मोरया ढोल पथकाच्या ढोल ताशाच्या निनादाने १४ व्या पार्ले महोत्सवाचा उद्घाटन सोहळा दुमदुमुन गेला.

पार्ले महोत्सव म्हणजे देशाच्या अर्थिक राजधानी असलेल्या मुंबईची शान आहे असे कौतुकोद्गार विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी मॅरेथॉन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी काढले. तर गायन स्पर्धेप्रसंगी तर स्पर्धेच्या निमित्ताने स्पर्धक मेहनत घेत असतो व आपली किती तयारी झाली आहे हे त्यास कळते. मात्र मिळालेले यश किंवा अपयश विसरून पुन्हा मेहनत सुरू केली तरच एक उत्तम कलावंत निर्माण होईल, असे प्रतिपादन सुप्रसिध्द गायिका उत्तरा केळकर यांनी साठ्ये महाविद्यालयामधील उभारलेल्या स्वर्गीय विनय आपटे नगर सुरू असलेल्या गायन स्पर्धेच्या प्रसंगी काढले. स्पर्धेच्या निमित्ताने आपणास खुप काही शिकता आले असून पार्ले महोत्सव सारख्या स्पर्धांची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

१४ व्या पार्ले महोत्सवा मधील पहिल्याच दिवशी गायन, थ्रो बॉल, मॅरेथॉन, ५० मिटर धावणे, गोळ फेक, स्लो सायकलिंग अशा स्पर्धामधून सुमारे ५ हजार स्पर्धकांनी भाग घेतल्याने महोत्सवाची सुरूवात दणक्यात झाली. विशेषतः ५० मिटर शर्यतीत भाग घेतलेली ५ वर्षाची प्राची देसाई व अवघ्या ४ वर्षीची देविका पारकर व ५ किमी शर्यतीत धावलेल्या ६८ वर्षीय प्रमिला व ६२ वर्षिय दक्षा कनाविया, नेत्रहिन असुनही १० किमी धावणारे अमरजीत सिंग चावला, पी चंद्रा, व नीशा खरे, गीत गीयन स्पर्धेत भाग घेणाऱ्या ५ वर्षीय आस्था हळदणकर व ८० वर्षीय मधुकर पाठारे तसेच ५० मिटर धावणे व गोळाफेकमध्ये भाग घेणारे दिशा कर्णबधीर शाळेतील विशेष मुलींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पहिल्याच दिवशीच्या विविध स्पर्धामध्ये पुणे, नाशिक औरंगाबाद, जळगाव तसेच कलकत्यातूनही स्पर्धक सहभागी झाली आहेत.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.